## कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

**टोल फ्रि क्रमांक 1064**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** दिनांक :- **11.02.2020.**

**सातेफळ सज्जा ता. जाफ्राबाद, जि. जालना येथील तलाठी श्री. निवृत्ती तावजी वाघ वय 46 वर्षे, व्यवसाय नोकरी तलाठी सातेफळ सजा, अतिरीक्त पदभार सावंगी वरगणे सजा ता. जाफ्राबाद जि.जालना यांचेसह खाजगी इसमास 20,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | 1. श्री. निवृत्ती तावजी वाघ वय 46 वर्षे, व्यवसाय नोकरी तलाठी सातेफळ सजा, अतिरीक्त सजा सावंगी वरगणे ता. जाफ्राबाद जि.जालना<br>2. श्री. कृष्णा पाटीलबा वरगणे वय 31 वर्ष रा सावंगी वरगणे ता जाफ्राबाद जि. जालना ( खासगी इसम ) |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक 11.02.2020 रोजी जाफ्राबाद जि.जालना येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 20,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी दिनांक 11.02.2020 रोजी तक्रार दिली की, मी वाळु वाहतूकीचा व्यवसाय करीत असून वाळूची गाडी चालू देण्यासाठी तसेच माझे वाळूचे गाडीचे चालकाचा घेतलेला मोबाईल परत देण्यासाठी सातेफळ सजाचे व अतिरीक्त पदभार सजा सावंगी वरगणे येथील तलाठी निवृत्ती तावजी वाघ यांनी 20,000/- रुपयांची मागणी लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन आज दिनांक 11/02/2020 रोजी लोकसेवक श्री. निवृत्ती तावजी वाघ वय 46 वर्षे, व्यवसाय नोकरी तलाठी सातेफळ सज्जा, अतिरीक्त पदभार सजा सावंगी वरगणे ता. जाफ्राबाद जि.जालना यांनी त्यांचे सोबतचे खाजगी इसम नामे श्री. कृष्णा पाटीलबा वरगणे यांचे हस्ते पंचासमक्ष लाच स्वीकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पथकाने बुलढाणा अर्बन बॅकेसमोर जाफ्राबाद येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक श्री. निवृत्ती तावजी वाघ वय 46 वर्षे, व्यवसाय नोकरी तलाठी सातेफळ सज्जा, अतिरीक्त पदभार सजा सावंगी वरगणे ता. जाफ्राबाद जि.जालना व खाजगी इसम नामे श्री. कृष्णा पाटीलबा वरगणे वय 31 वर्ष रा सावंगी वरगणे ता जाफ्राबाद जि. जालना यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 9823142632, 9767747774 वर संपर्क करावा.**

( एस.एस.ताटे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.